## "रुपेरी किनार" - पुस्तक परीक्षण

"रुपेरी किनार" हे सौ. कल्पना जावडेकरांनी लिहिलेले पहिले पुस्तक. बावन्नाव्या वर्षीदेखील स्वतःचीच लिव्हर नवऱ्याला donate करायची जबरदस्त इच्छा, किंबहुना अट्टाहास करणाऱ्या, कुटुंब वत्सल, प्रेमळ आणि मनस्वी स्त्रीची ही एक सत्यकथा आहे. कल्पनाताईन्चे नवर्यावरचे जीवापाड प्रेम आणि प्रसंगी प्राणावरही उदार होण्याची तयारी या पुस्काकातून उत्कटपणे जाणवते. वाचकांना खिळवून ठेवणारी, आवर्जून वाचावी अशी, आणि प्रसंगी मन हळुवार बनवून वाचकाला अश्रू ढाळायला लावणारी, अशी ही एक वेधक कहाणी आहे.

लिव्हर निष्काम झाल्याचे निराशादायी निदान, त्यानंतर बघाव्या लागणाऱ्या नवर्याच्या यातना, हतबलता, आणि बरे होण्याचा एकमेव मार्ग म्हणजे लिव्हर transplant सारखं २२ ते २४ तास चालणारं ऑपरेशन. ऐन उमेदीच्या वयात, वैभवाच्या शिखरावर असताना, नियतीनी केलेले आघात, त्यामुळे निर्माण झालेली अगतिकता, नैराश्याच्या गर्तेत सर्व कुटुंब कसे हेलावून निघते याचे हृदयस्पर्शी वर्णन या पुस्तकात आहे. परंतु जगण्याची उमेद, अनावर इच्चाशक्ती, प्रचंड आत्मविश्वास, देवावरची अढळ श्रद्धा, आणि त्याचबरोबर सगेसोयरे, नातलग, मित्र परिवाराचा मदतीचा हात - यामुळे मृत्युच्या दाढेतून कशी सुटका झाली - अशी ही आधुनिक सत्यवान सावित्रीची कहाणी.

"मागच्यास ठेच पुढचा शहाणा" ह्या म्हणी प्रमाणे जावडेकर कुटुंब ज्या अग्निदिव्यातून गेले, त्यांचे अनुभव, अडचणी, त्यातून बाहेर पडायचे मार्ग, हे सर्व लोकांपर्यंत पोचवण्याची मनापासूनची इच्छा, धडपड, हाच या पुस्तकामागचा प्रपंच. आणि आश्चर्य म्हणजे या घटनेला दोन वर्षे होऊन गेल्यावर, काहीही नोंदी केलेल्या नसताना, आणि पूर्वीचा लिहिण्याचा विशेष अनुभव नसताना, अगदी थोडीशी सुद्धा खाडाखोड न होता लेखिकेने स्वहस्ते हे पुस्तक लिहून काढले - म्हणजे साक्षात सरस्वतीनेच हे लिहवून घेतले असं म्हटलं तर त्यात काही वावग होणार नाही.

मला तर वाटतं की फक्त लिव्हर transplant चा रोगी नाही तर कुठल्याही असाध्य रोगाने पिडीत व्यक्ती किंवा जवळच्या कुटुंबीयांनी अवश्य वाचावं असं हे पुस्तक आहे. चैतन्यमयी वृत्ती, ईश्वरावरची अढळ श्रद्धा, तसंच क्षेत्रातील हुशार व निष्णात डॉक्टर, जवळची कौटुंबिक मंडळी, मित्रपरिवार, हितचिंतक, यांचा भक्कम पाठिंबा, आणि सर्वात महत्वाचं म्हणजे झुंजण्याची जिद्द व जबरदस्त इच्छाशक्ती ही पाठीशी असल्यावर कितीही मोठी लाट आली तरी आपण तरून जाउ हा आशावाद कोणालाही उपयोगीच ठरेल. तेव्हा हे पुस्तक सर्वांनी संग्रही ठेवावं असं आहे. शिवाय कल्पना ताईन्नी ह्या पुस्तकाच्या विक्रीतून मिळणारं उत्पन्न "वंचित विकास" ह्या सामाजिक संस्थेसाठी देणगी देण्याचं जाहीर केलं आहे - म्हणजे एकाच दगडात दोन पक्षी!

स्नेहल ताम्हनकर
स्कॉच प्लेन्स, न्यू जर्सी